# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 07.09.2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 07.09.2012 (का.प.क्र.12) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्रशासन) श्री.रविंद्र निकम, प्र.नगर सचिव तथा विधी सल्लागार श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
07. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
08. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
09. स. श्री. खान अक्रम करीम खान
10. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
11. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
12. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप

मा.सभापती :ॲक्शन पॉईट क्रमांक 1 बाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(इ व फ):सुमित कन्स्ट्रक्शन यांना ब्लॅकलिस्टमधुन वगळण्याबाबत कार्यावाही सुरू केलेली आहे.

मा.सभापती :ॲक्शन पॉईट क्रमांक 2

कार्यकारी अभियंता(इ व फ):स.सदस्य श्री.हळनोर यांचे वार्डातील पेव्हर ब्लॉकचे काम सोमवारी सुरू करण्याचे आश्वासन देण्यात येते.

मा.सभापती :ॲक्शन पॉईट क्रमांक 3

कार्यकारी अभियंता(इ व फ):स.सदस्या श्रीमती घडमोडे यांचे वार्डातील जिजाऊ उद्यान बाबतची संचिका पुढील मान्यतेसाठी कार्यावाही अंतर्गत आहे.

मा.सभापती :स.सदस्य श्री.गुजर यांचे वार्डातील कामाबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(इ व फ):सदरील काम कार्यवाही अंतर्गत आहे.

मा.सभापती :ॲक्शन पॉईट क्रमांक 5 एमजीएम, कैलास नगर रस्ता रूंदिकरणातील असलेले ड्रनेज लाईन, वॉटर लाईन बाबत कार्यवाही करणे

उपअभियंता (ड्रनेज) :कैलास नगर रस्ता रूंदिकरणातील ड्रनेजचे काम 99 टक्के पुर्ण झालेले आहे. पुढील काम वार्ड फ अंतर्गत आहे.

शाखा अभियंता (श्री.संधा) :लवकरच वर्क ऑर्डर होवुन वॉटर लाईन टाकण्याबाबत कार्यावाही

करण्यात येईल.

**मा.सभापती** :ॲक्शन पॉईन्ट क्रमांक 7 हनुमान नगर येथील विद्युत पोल वरील लाईट सुरू करणे.

**कार्यकारी अभियंता (वि)** : काम सुरू करण्यात आलेले आहे.

**मा.सभापती** :ॲक्शन पॉईन्ट क्रमांक 8

**कार्यकारी अभियंता (वि)** :सदरील काम मोठया स्वरूपातील आहे. महाजन कॉन्ट्रेक्टर यांना काम देण्यात आलेले आहे. मनपातर्फे गाडी देण्यात आलेली आहे. काम मार्गी लागेल.

**श्री.नारायण कुचे** :एकुण किती बीओटी प्रकल्प चालु आहे. याबाबत माहिती देण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता(बीओटी)**:चार बीओटी प्रकल्प चालु आहे.. ज्योतीनगर येथील स्विमिंग पुल, शहानुरवाडी येथील भाजी मार्केट, रेल्वेस्टेशन येथील शॉपिंग कॉम्पलेक्स, सिध्दार्थ गार्डन येथील कॉम्पलेक्स जे एक लाख स्केवअर मिटरची जागा शहानुरवाडी येथील जागा हॅन्ड ओव्हर करण्यात आलेली आहे. टेंडर कॉल करण्यात आलेले आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** : 1 लाख 24 हजार स्के.फिट जागेवर भाजी मार्केटसाठी ओटे तयार करण्यात आलेले आहे. ते डेव्हलप झाल्यावरही काम चालू आहे.

**मा.सभापती** :कन्सेप्ट काय होते?

**कार्यकारी अभियंता(बीओटी)** :शहानुरवाडी येथे 40 गाळे, भाजी विक्री दुकाने तयार करायची आहे. त्यासाठी 40 दुकाने कायमस्वरूपी बांधण्यात आलेले आहे. त्याच्या समोर 1 लाख स्के.फिट 10000 स्केवर वर युरोपिअन मार्केटचा कन्सेप्ट आहे. युरोपिअन मार्केटचे टेंडर कॉल करण्यात आलेले आहे. एजन्सी फायनल झालेले आहे. कन्सेशन ॲग्रीमेंट झालेले आहे. काम सुरू करण्यासाठी कमीत कमी चार महिने लागणार आहे. शेड टाकवे लागणार आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :आज जे ओटे टाकण्यात आलेले आहे. ते रिकाम्या अवस्थेत आहे. तिथे भाजी विक्रेत्यांना शिफ्ट का? करण्यात येत नाही. सध्या बाजार रस्त्यावर भरविण्यात येतो.

**मा.सभापती** :शिवाजीनगर, गारखेडा व इतर ठिकाणी रस्त्यावर भाजी मार्केट भरविण्यात येते. कित्येक वर्षापासून हा त्रास सहन करावा लागत आहे. बांधलेल्या ओटयांवर भाजी मार्केट भरू शकत नाही का?

**कार्यकारी अभियंता(बीओटी)**:ओटे बांधुन मालमत्ता विभागास हस्तांतर केलेले आहे. त्या ठिकाणी भाजी मार्केट भरविण्यास काही हरकत नाही. परंतु रस्त्यावर जे भाजी मार्केट भरविण्यात येते त्याची संख्या 100 ते 150 एवढी आहे व त्या ठिकाणी फक्त 40 ओटे बांधण्यात आलेले आहे. 50 जणांना त्या ठिकाणी ते ओटे अलॉट करू शकतो.

**श्री.रेणुकादास वैद्य** :बाजार भरविण्यास काय अडचण आहे.

**कार्यकारी अभियंता(बीओटी)**:एक लाख स्के.फिट जागा असुन त्याचे टेंडर कॉल केलेले आहे. त्या ठिकाणी युरोपिअन मार्केट तयार करणार आहे.

**श्री.गिरजाराम हळनोर** :युरोपिअन मार्केटसाठी चार महिणे लागणार आहे. तयार झालेल्या ओटयांवर भाजी मार्केट सुरू करण्यास काय? अडचणी आहेत.

**कार्यकारी अभियंता(बीओटी)**: सोमवारी एका दिवसासाठी बाजार भरणार आहे. त्यानंतर साफसफाई व इतर बाबी मनपाला करावे लागणार आहे.

**श्री.गिरजाराम हळनोर** :वेगवेगळया ठिकाणी भाजी मार्केट भरविले जाते त्या ठिकाणची

**साफसफाई कोण करतो.**

**कार्यकारी अभियंता(बीओटी): काम सुरू करण्यास अडचणी आहे. विकासकाला साईड फ्रि साईड द्यावी लागणार आहे. डेव्हलपमेंट करतांना अडचणी येणार आहे. काम सुरू झालेले आहे.**

**मा.सभापती :आठवडयातुन एकदा काम बंद करण्यास सांगु व मंगळवारी साफसफाई करून देण्यात येवु. भाजी मार्केट त्या ठिकाणी शिफ्ट करू या तसेच त्या ठिकाणी दोन्ही बाजुला ब्रिज झालेले आहे. पार्कीगची सोय झालेली आहे.**

**कार्यकारी अभियंता(बीओटी):वर्कीग कंन्डीशनमध्ये प्रश्न निर्माण होणार आहे. तसेच गणेश उत्सव आहे त्या ठिकाणी मोठा पंडाल पडणार आहे. 15 दिवसानंतर निर्णय घेण्यात यावा.**

**श्री.रेणुकादास वैद्य :बाजार त्या ठिकाणी शिफ्ट केल्यावर मनपास उत्पन्न प्राप्त होईल.**

**मा.सभापती :ओटे शिफ्ट झालेले आहे का?**

**कार्यकारी अभियंता(बीओटी):काही ओटे शिफ्ट झालेले आहे. टेंडर कॉल केलेले आहे.**

**मा.सभापती :एका ओटयांवर दोन ते तीन भाजी विक्रेते बसु शकतात एवढा मोठा स्पेस आहे. सोमवारी प्रशासकीय अधिकारी यांनी स्टाफ उभा करून बाजार शिफ्ट करण्यात यावा.**

**कार्यकारी अभियंता(बीओटी):गणपती उत्सवचा पंडाल आतमध्ये टाकण्यात येतो. जॉईंट व्हिजीट देवुन निर्णय घेण्यात यावा.**

**मा.सभापती :जागा मोठी आहे. गणेश उत्सवास अडचण येणार नाही. दिवसा बाजार भरणार आहे. रस्त्यावर बाजार भरविल्यामुळे जनतेला प्रचंड त्रास आहे. कोर्टाची ऑर्डर आहे की, नऊ ते पंच्चेचाळीसमध्ये कुठेही काही झाले नाही पाहिजे. त्या ऑर्डरच्या अगेष्टमध्ये ते बसतात. सोमवारपासून प्रयत्न करण्यात येईल. बीआय यांना बाजार शिफ्ट करण्याकरीता त्या ठिकाणी कार्यरत ठेवण्यात यावे. मालमत्ता विभागाने सोमवारचा बाजार भरणार म्हणुन जाहिर प्रगटन देण्यात यावा. मालमत्ता वसुली बाबत मालमत्ता विभागाने तात्पुरती मनपा कर्मचाऱ्यांकडुन वसुली करण्या यावी.**

**श्री.गिरजाराम हळनोर :आठवडी बाजाराच्या चौकात दोन्ही बाजूंनी फास्ट फुड दुकाना तयार झालेल्या आहेत. त्या ठिकाणी विनापरवाना दुकाना चालविण्यात येतात. त्यामुळे जनतेला त्रास सहन करावा लागत आहे.**

**मा.सभापती :परवानगी घेतलेली आहे किंवा नाही.**

**आरोग्य अधिकारी :या बाबत माहिती घऊन माहिती देण्यात येईल.**

**मा.सभापती :आठवडी बाजाराच्या ठिकाणी चौपटीच्या ठिकाणी अनाधिकृतरीत्या फास्ट फुडच्या दुकाना भरविल्या जातात. आरोग्य बाबत प्रश्न निर्माण होत आहे. त्यांना कायदेशिर नोटीस देवुन रितसर परवानगी घेण्याबाबत कळविण्यांत यावे. तसेच परवानगी न घेणाऱ्या दुकानांविरूध्द कडक कारवाई करण्यात यावी.**

**श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील आरोग्य केंद्र, रूग्णालय, दवाखाने यांना महानगरपालिकेच्या वतीने फायर एनओसीसाठी नियमावली ठरवली आहे का? खुलासा करण्यात यावा.**

**मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.**

**मुख्य अग्निशमन अधिकारी:महाराष्ट्र शासनाने सन 2009 पासून महाराष्ट्र फायर सर्विस ॲण्ड लाईफ सेफ्टी ॲक्ट -2009 महानगरपालिकेसाठी लागू केलेला आहे.**

त्यानुसार सर्व रूग्णालये, पब्लिक बिल्डींग, त्यांना फायर ब्रिगेडची परवानगी घ्यावी. अशी सक्तीचे केलेले आहे. शासनाने नियमावली तयार करून दर ठरविलेले आहेत. महानगरपालिका 10 ते 25 लाखाच्या कॅटेगरीमध्ये येतात. 20 हजार रूपयांपासून सुरूवात आहे. बिल्टअप ऐरिया जसाजसा वाढेल त्याप्रमाणे दर आहे. 5 रूपये प्रती स्के.मिटर किंवा कमीत कमी 20 हजार रूपये एवढे आहे. रिनिवल फिस 10 हजार, 5 हजार, 4 हजार आणि 3 हजार असे आहे. तीन स्लॅप केलेले आहे. 2, 3 आणि 5 रिनिवलमध्ये.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सदरील दर आपण ठरविले आहे का?

**मुख्य अग्निशमन अधिकारी**:सदरील दर शासनाने ठरविलेले आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :मोठमोठया हॉस्पीटलसाठी आणि छोटे क्लिनीकसाठी सारखेच दर हे योग्य नाही. यामध्ये पॉलिसी ठरवावी लागणार आहे. डिस्पेन्सरी, क्लिनीक किंवा छोटा दवाखाना यांना हे शुल्क परवडणारे नाही. त्यांचेकडुन 1000 ते 1500 शुल्क आकारण्यात यावे. त्यानंतर 10 बेडपर्यंत 2 ते 3 हजार रूपये 10 बेडच्या पुढे 3 ते 4 हजार रूपये शुल्क आकारावे अशा पध्दतीने दर आकारण्यात यावे. जेणे करून त्यांना पैसे भरण्यास गैर वाटणार नाही. जास्त दर आकारल्यास ते भरणार नाही फक्त कागदोपत्रीच दर राहतील. त्यामुळे अशा पध्दतीचे स्ट्रक्चर तयार करण्यात यावे तसेच रिनिवल चार्जेस त्याच्या 1/3 असावे व ते दरवर्षी भरून घेण्यात यावे. यास परवनागी देण्यात यावी.

**मा.सभापती** :शहरातील आयएमआयचे सर्व पदाधिकारी, डॉक्टर, यां सर्वांचे मा.महापौरांकडे व पदाधिकाऱ्यांकडे निवेदन आले होते. 1 बेड असो वा 100 बेड असो शासनाने एकच नॉर्मस् लावण्यात आलेले आहे. आपल्या शहराच्या बाबतीत विचार करणे आवश्यक आहे. सर्वांना एकाच कॅटेगिरीमध्ये धरणे सभागृहाला योग्य वाटत नाही. हे वन टाईम आहे का?

**मुख्य अग्निशमन अधिकारी**:वन टाईम आहे. रिनिवल फिस दरवर्षाला आहे. 0 ते 10 बेडपर्यंतला सध्या ज्यांचा एरिया 1500 स्के.फुट आहे त्यांना फक्त 3000 दर घेण्यात येतो. त्यांच्याकडुंन 20000 दर घेण्यात येत नाही.

**मा.सभापती** :शहरात काही हॉस्पीटल मोठया स्वरूपातील आहे व छोटे क्लिनीक आहे त्याठिकाणी फक्त एकच बेड आहे. त्याप्रमाणे दर लागु करावे असे सभागृहाचे मत आहे. क्लिनिक, डिस्पेन्सरी, हॉस्पीटलसाठी झीरो बेडच्या क्लिनिकला 1000 रूपये, 0 ते 10 = 3000, 11 ते 25 = 4000, 26 ते 50 = 5000 आणि 51 ते पुढे शासनाच्या निर्णयाप्रमाणे दर आकारणी करण्यात यावी. तसेच (renewal) नुतनीकरणसाठी या रक्कमेच्या 1/3 रक्कम आकारणी करण्यात यावी.

**मा.सभापती** :एलबीटीबाबत एक निवेदन आलेले आहे. नऊ ठिकाणी स्पॉट उभे करून चेकींगसाठी ठेवण्यात आले आहे. त्यांना शहरात राऊंड मारण्यासाठी तसेच एलबीटीमध्ये वाढ होण्याकरीता 15 लाखाची वाहन खरेदीसाठी कार्योत्तर मंजूरी प्रशासनाच्या विनंतीवरून देण्यात येते.

**श्री.नारायण कुचे** :मनपामध्ये वाहनांचा खर्च किती होतो याबाबतची माहिती देण्यात यावी.

तसेच उपद्रव शोधक पथकावर किती खर्च होतो याबाबतची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :उपद्रव शोधक पथक बाबत माहिती देण्यात यावी. पुढील बैठकीत पद्रव शोधक पथकावरील कर्मचारी, वाहन वइतर बाबींवर झालेला खर्च, कारवाई तसेच आकारणी करण्यात आलेल्या दंडाबाबत माहिती येणाऱ्या स्थायी समितीमध्ये देण्यात यावी.

श्री.नारायण कुचे :चिकलठाणा, सेव्हण हिल उड्डाणपुल येथील अनाधिकृत बांधकामाबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली?

श्री.रेणुकादास वैद्य :सेव्हण हिल उड्डाणपुल तसेच एमआयटी येथील शैक्षणिक झोनवरील आरक्षण असलेल्या जागेवर अनाधिकृत बांधकामाबाबत प्रशासनाने अनेक वेळा सांगुनही कार्यवाही केलेली नाही.

मा.सभापती :सदरील विषय नेहमीच चर्चेत येत आहे. एमआयटीच्या बाबतीत एज्युकेशनवर मोठया प्रमाणात बांधकाम चालू आहे.

उपआयुक्त(सिडको) :सदरील प्रकरणात मा.न्यायालयाचा स्थगिती आदेश आलेला आहे.

विधी सहाय्यक :एमआयटी कॉलेज जवळील अनाधिकृत बांधकामासंबधाने हा विषय चालू आहे. सातारा येथील गट क्रमांक 28 ते 44 आणि 44 ते 76 यापैकी 55 क्रमांकाचा हा गट क्रमांक आहे. यामध्ये अनाधिकृत बांधकाम आहे असे मनपाचे म्हणने होते. परंतु नईम खान या व्यक्तीने दावा केला आहे की, दिवाणी न्यायालयामध्ये यामध्ये सातारा ग्रामपंचायतीची परवानगी दाखल केलेली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, हा भाग मनपाच्या हद्दीमध्ये येत नाही. यामध्ये मा.उच्च न्यायालयानेसुध्दा हि बाब निदर्शनास आणुन तेथील निवडणूक प्रक्रीयेमध्ये वार्ड फॉर्मेशन वगळण्यात आलेले होते. जो पर्यंत शासनाकडुन याबाबतीत काही निर्णय होत नाही. तोपर्यंत यावर कार्यवाही करू नये . बांधकामामध्ये हस्तक्षेप करू नये असा दावा केलेला आहे आणि दिवाणी न्यायालय म्युनिसिपल कोर्ट यांनी हया सर्व बाबी लक्षात घेऊन मनपाने सर्व बाबी लक्षात घेऊन शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे तो पर्यंत सदरील बांधकामाबाबत हस्तक्षेप करता येणार नाही. सन 2010 मध्ये मनपाची जेव्हा सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यावेळी याच विभागातीन गट नंबर 28 ते 44 44 ते 76 गटनंबरमधील नागरीकांनी रिट याचिका दाखल केली होती की, या विभागातील नागरीक सातारा हद्दीमध्ये येतात त्यामुळे मनपाच्या हद्दीमध्ये त्यांना समाविष्ट करू नये. मा.उच्च न्यायालयाने मनपास याबाबतीत विचारणा केली. याबाबत तुमच्याकडे काय पुरावा आहे. मनपाने मा.उच्च न्यायालयामध्ये मनपाचा डिपी.प्लॅन जो भाग आहे. तो दाखविलेला आहे. हा भाग मनपामध्ये असल्याबाबत नोटीफिकेशन दाखविण्यात यावे म्हणुन मा.उच्च न्यायालयाने मनपास सांगीतले आहे. परंतु याबाबतील कुठलेही नोटीफिकेशन दाखवु शकलो नाही किंवा आपल्याकडे उपलब्ध नव्हते शासनाही दाखवु शकले नाही. जोपर्यंत शासनाकडुन नोटीफिकेशन इश्यु होत नाही तोपर्यंत मनपामध्ये समाविष्ट करू नये असा निर्देश दिलेला आहे. हा वादातील आहे. जोपर्यंत मा.न्यायालयात आहे त्यामुळे निर्णय घेता येणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :यामध्ये दोन गोष्टी मिक्स करत आहे. मतदानामध्ये रिट पिटीशन सादर झ

ाले होते त्या भागातील मतदार यादीतील होते. आता ज्या गोष्टी चालल्या आहेत त्या जमीनीच्या बाबतीत आहे. संबधीताने चालाखीने ग्रामपंचायती परवानगी, मा.उच्च न्यायालयाचा आदेश, जो आदेश फक्त मतदार यादीशी संबधीत आहे तो जोडुन मनपाच्या एज्युकेशन झोनवर अतिक्रमण केले आहे. असे माझे मत आहे. चुकीच्या पध्दतीने विषय हाताळण्यात येत आहे.

मा.सभापती :डिपी प्लॅनप्रमाणे गट नंबर 28 ते 44 44 ते 76 मनपाच्या हद्दीमध्ये आहे. प्लॅन सोडुन इतर शासनाकडुन जे गट नंबर येतात त्यात कुठे चुक झालेली आहे का?

सहा.संचालक न.र. :विकास योजनेच्या नकाशामध्ये सदरील गटनंबर स्पष्टपणे दिसतात. तथापी मा.उच्च न्यायालयाने मागणी अशी केली होती की त्याबाबत काही नोटीफिकेशन, जी.आर. असेलतर तो सादर करावा. मा.न्यायालयाने शासनाला आदेशीत केले होते. शासनाकडे ते उपलब्ध होऊ शकले नाही. महानगरपालिकेने सन 1935 मधील Correspondence हैद्राबाद गर्वमेंट कडुन मागविण्यात आला होता. परंतु त्या ठिकाणी उपलब्ध होऊ शकले नाही. तसे सबमिशन मा.उच्च न्यायालयात इलेक्शन पिटीशनला केले होते. प्लॅन मानत नाही. जी.आर. किंवा नोटीफिकेशन असेल तर तो दाखविण्यात यावा. ती माहिती दाखवु शकले नाही.

मा.सभापती :डिपी प्लॅन कोण मंजूरी देतो.

सहा.संचालक न.र. :शासन मंजूरी देतो.

मा.सभापती :शासनाला तसे कळविण्यात यावे की, सदरील गट क्रमांक आपल्या मंजूरीनुसार पाठविलेले आहे.

सहा.संचालक न.र. :न्यायालयामध्ये जेव्हा निर्णय झाला होता त्यानुसार शासनही नोटीफिकेशन सादर करू शकले नव्हते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मतदार वगळण्यात आल्यानंतर शासनाचे पत्र आले होते की, सातार्‍याचे आणि इतर सातार्‍याचे गट महानगरपालिकेमध्ये अंतर्भुत करणेसाठी महापालिकेचा ठराव घेऊन शासनाकडे पाठवावा. मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवुन त्यात काही बदल करून शासनाकडे ठराव पाठविण्यात आलेला आहे.

मा.सभापती :यासर्व गटाचा प्लॅनिंग ॲथोरिटी कोण आहे. परत एकदा शासनास याबाबत स्मरणपत्राद्वारे कळविण्यात यावे. सेव्हन हिल उड्डाणपुलाबाबत खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र. :मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्तांनी माझे आदेश काढण्यात आले त्यानुसार रिपोर्ट सादर करण्यात आला आहे. परंतु नगर रचना विभागानेच दिलेली परवानगी असल्याने तो अहवाल स्विकारण्यात आला नव्हता.

मा.प्र.आयुक्त :या संदर्भात माहिती घेऊन काही वेळात माहिती सादर करण्यात येईल.

मा.सभापती :पीआर कार्ड रद्द झाल्यानंतर महापालिकेची काय भुमिका आहे ते थोडक्यात सांगण्यात यावे.

सहा.संचालक न.र. :ज्या वेळेस बांधकाम परवानगी दिली त्यावेळेस पीआर कार्ड संबधीताच्या नांवे होते. जेव्हा लेआऊटचा डिसपुट चालू होता. जिल्हा न्यायालयाने निर्णय दिला की, पीआरकार्ड मध्ये त्यांचे नांव समावेश करावा आणि

त्यांना बांधकाम परवानगी देण्यात यावी असे खालच्या कोर्टाने आदेश दिले. त्यानुसार महानगरपालिकेतर्फे परवानगी देण्यात आली. त्यानंतर सिटी सर्वेतर्फे पीआर कार्ड रद्द करण्यात आले. पीआर कार्ड रद्द झाल्याने मनपाने दिलेली बांधकाम परवानगी चुकीची आहे असे होत नाही. ती जागा निवासी क्षेत्रामध्ये असल्याने ओनरशिपचा डिस्पुट असेल तो येईल आणि त्यांची ती जबाबदारी राहील. मनपाने त्या भुखंडावरती दिलेली बांधकाम परवानगी विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे व एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे दिलेली आहे. महानगरपालिकेचा पीआर कार्ड रद्द झाल्यावर काही रोल राहत नाही.

श्री.नारायण कुचे :पीआरकार्ड रद्द झाल्यानंतर झालेल्या बांधकामाबाबत प्रशासनाने काय केले.

| | |
|---|---|
| सहा.संचालक न.र. | :पीआर कार्ड रद्द झाल्याने बांधकाम परवानगी संपल्याने बांधकाम करू नये बांधकाम केल्यास ते अनाधिकृत बांधकाम होईल हे सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे त्या तारखेला मनपाने पत्र दिलेले आहे. प्रशासकीय अधिकारी यांनी त्या तारखेला पंचनामा केलेला आहे. पंचनाम्यानंतर संबधीताने जास्तीचे बांधकाम केलेले असेल. ते अनाधिकृत आहे. त्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही व्हायला पाहिजे. |
| मा.सभापती | :एवढी ताकीद देऊनही बांधकाम होते हे योग्य नाही. बांधकाम परवानगीची मुदत संपलेली आहे. मालक बदलल्यास रितसर बांधकाम परवानगी दाखल होईल. पंचनामा झाल्यानंतरच्याबाबतीत प्रशासकीय अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करण्यात यावी. |
| प्रशासकीय अधिकारी | :यावरही स्थगीती आदेश आलेले आहेत. विधी सहायक यांचा अभिप्राय घेण्यात यावा. |
| मा.सभापती | :रेल्वेस्टेशन येथील बांधकाम बाबत काय कार्यवाही केली. |
| प्रशासकीय अधिकारी | :रेल्वेस्टेशन येथील बांधकामाबाबतीत स्थगीती आदेश आलेले आहेत. |
| विधी सहायक | :कार्यवाही करण्यापुर्वी नोटीस, पंचनामा दिल्यास विधी विभागामार्फत निश्चित कार्यवाही करण्यात येईल. |
| मा.सभापती | :विधी विभागाशी समन्वय साधायला हवा. |
| विधी सहायक | :चिकलठाणा प्रकरणाबाबतीत आज मा.न्यायालयात सुनावणीसाठी आहे. जे आदेश होतील त्यानुसार कार्यवाही होईल. तसेच प्रशासकीय विभागाकडुन जो पंचनामा केलेला आहे. त्याबाबतची माहिती मा.न्यायालयात सादर केलेली आहे. |
| श्री.नारायण कुचे | :डस्टबीनच्या अहवालाबाबत माहिती देण्यात यावी. |
| श्रीमती प्राजक्ता राजपूत | :शिलाई मशिन आयएसआय मार्क नाहीत. त्या रद्द करून चांगल्या प्रतीच्या शिलाई मशिनचे वाटप करण्यात याव्यात. |
| श्री.विजेंद्र जाधव | :शिलाई मशिन आयएसआय मार्कची आहेत का? |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| श्री.नारायण कुचे | :मा.सर्वसाधारण सभेतही या विषयाबाबतीत चर्चा झालेली आहे. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :महिला बालकल्याण अधिकारी कोण आहे. त्या ठिकाणी अधिकाऱ्याची नेमणुक केलेली आहे का? महत्वाच्या विभागासाठी कायमस्वरूपी अधिकारी देण्यात यावा. |
| उपआयुक्त (प्र) | :मा.आयुक्त महोदयांनी या संदर्भात कमिटी गठीत केलेली आहे. आयएसआय मार्क, आरसी प्रमाणे खरेदी केलेली या संबधात अहवाल सादर करण्यास सांगीतलेला आहे. या समितीमध्ये शहर अभियंता, उपआयुक्त(प्र), मुख्यलेखाधिकारी, उपअभियंता (यांत्रिकी), महिला बाल कल्याण अधिकारी या समितीने अजुन दिलेला नाही. येत्या 24 तासामध्ये अहवाल सादर करण्यात येईल. |
| मा.सभापती | :मागील अडीच वर्षापासून शिलाई मशिन दिलेल्या नाहीत. ज्या मशिन सप्लाय झालेल्या आहेत त्या  आयएसआय मार्कच्या नाहीत. 200 मशिन आलेल्या आहेत सर्वसाधारण सभा स्थायी समिती सभेमध्ये वारंवार या विषयावर चर्चा होते. यावर तातडीने प्रशासनाने निर्णय घ्यावा. |
| श्रीमती सविता घडमोडे | :अरबाज, राठोड कंन्स्ट्रक्शन यांनी घेतलेल्या कामाबाबत काय निर्णय घेतलेला आहे. |

**मा.सभापती** :सदरील विषय सुरवातीलाच झालेला आहे.

**विषय क्र. 46 :** (विषय क्र. 40 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 28/08/2012 (दि.21/08/12 ची तहकुब सभा

का.प.क्र.10) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** : स्थगीत.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 47 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2012-13 या वर्षासाठी मौ.चिकलठाणा येथील आठवडी बाजार फी वसुली ठेका देण्यासाठी प्रथम दि.23/04/2012 रोजी काढलेल्या जाहीर निविदा / सूचनेमध्ये एक निविदा प्राप्त झाल्याने फेरनिविदा काढण्याच्या प्रशासकीय निर्णयानंतर जा.क्र.मनपा/मामअ/707/ 2012, दिनांक 07/07/2012 फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली असता खालील निविदाधारकांनी निविदा दाखल केल्या व प्राप्त निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

1. श्री.संतोष राजू कांबळे - रू. 8117/-
2. श्री.सचिन मोहन दाभाडे- रू. 7500/-
3. श्री.राजू राहुल गिरधारे - रू. 6786/-

या निविदामध्ये महानगरपालिकेने सदरील बाजारासाठी आधारभुत किमंत प्रती बाजार रू.19630/- नमूद केली होती. प्राप्त निविदा दर हे आधारभुत किमंतीपेक्षा कमी असल्याने व फेरनिविदा व निविदा कालावधी इ. सह बाजाराचा विचार करता प्राप्त निविदा दरासंबंधाने उच्च दराचे निविदाधारकास वाटाघाटीस बोलविले असता श्री.संतोष राजू कांबळे यांनी वाटाघाटीमध्ये रू. 8501/- प्रती बाजार याप्रमाणे दर देण्याचे मान्य केले. यास प्रशासकीय मान्यता झाली असून नेहमीच्या अटी शर्तीनुसार निविदा रक्कमेच्या 25% रक्कम व 25% बँक गॅरंटी घेऊन निविदाधारक श्री.संतोष राजू कांबळे यांना रक्कम रू.8501/- प्रती बाजार या दराने दि.31/03/2013 पर्यंत चिकलठाणा आठवडी बाजार फी वसुली करण्यासाठी देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा.सभापती** : विषय क्रमांक 47, खुलासा करण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी** :विषय क्रमांक 47 आठवडी बाजाराबाबत आहे. 8501/- पैसे भरले पाहिजेत. सदरील निवीदा फेर निवीदाचे आहेत.

**श्री.नारायण कुचे** :यापुर्वी निविदा जास्त रेटची आली होती.

**मालमत्ता अधिकारी** :यापेक्षा कमी रेट होते हे नविन काढलेले आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :आधारभुत किंमत 19630/- कशावरून काढण्यात आलेली आहे.

**मालमत्ता अधिकारी** :10 टक्के नैसर्गिक वाढ या प्रमाणात काढलेली आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सध्या वसुली कोण करतो.

**मालमत्ता अधिकारी** :महानगरपालिका तर्फे वसुली होते साधारणत:8000/- येतात.

**श्री.रेणुकादास वैद्य** :19630/- किंमत कशी लावली.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :मनपा तर्फे 8000/- वसुली होते आणि 19000/- व्हॅल्युएशन कशी लावली जाते.

**श्री.नारायण कुचे** :पहिले एकच टेंडर आले होते. पुन्हा यांनी टेंडर काढले.

**मा.सभापती** :प्रशासनाने जी माहिती मागवायची आहे ती मागविण्यात यावी तोपर्यंत पुढील विषय घेण्यात येईल.

**मा.सभापती** :मालमत्ता बाबतच्या विषयाबाबत खुलासा करण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी** :या प्रकरणात 24 एप्रिलला एकच निवीदा प्राप्त झाली. निवीदा 8,111/- रूपयाची असल्याने व एकच असल्याने ती पुन्हा काढली. आता तेच दर आल्याकारणाने पुन्हा वाटाघाटी केल्यात त्यामध्ये 8,500/- दर अंतिम केला.

**मा.सभापती** :संबधीत गुत्तेदार कोण होते.

**मालमत्ता अधिकारी** : श्री.संतोष कांबळे होते.

**मा.सभापती** :विषय क्रमांक 47 मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2012-13 या वर्षासाठी मौ.चिकलठाणा येथील आठवडी बाजार फी वसुली ठेका देण्यासाठी प्राप्त उच्च निविदाधारक श्री.संतोष राजू कांबळे यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांना रू. 8501/- प्रती बाजार याप्रमाणे नेहमीच्या अटी शर्तीनुसार दि.31/03/2013 पर्यंत चिकलठाणा आठवडी बाजार फी वसुली करण्यासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 48 :**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील चिकलठाणा (नवीन) व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (7) भाडे तत्वावर मिळणे संबंधाने अर्जदार श्री.जफर मकदुम काझी यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 13.75 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकान यापूर्वी लिलावाने देण्यात आलेल्या व्यक्तीने ताब्यात घेतली नसल्याने रिक्त आहे. सदर गाळयांचे भाडे शीघ्र गणकानुसारचे भाडे दराचे दिडपट म्हणजे रू.2700/- एवढे होते. अर्जदार या भाडे दरापेक्षा अधिक म्हणजे रक्कम रू.3500/- प्रतिमाह देण्यास तयार आहे. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.3500/- प्रतिमाह निश्चित करून नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहुन सदर दुकान भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा.सभापती** : विषय क्रमांक 48, खुलासा करण्यात यावा.

**मालमत्ता अधिकारी** :चिकलठाणा येथील व्यापारी संकुलातील दुकान क्रमांक 700 रिकामे आहे त्यांच्या मागणीनुसार दुकान भाडयाने देण्यात येत आहे.

**मा.सभापती** :विषय क्रमांक 48 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील चिकलठाणा (नवीन) व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (7) रक्कम रू.3500/- प्रतिमाह प्रमाणे श्री.जफर मकदुम काझी यांना नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहुन सदर दुकान भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 49 :**

मा.उच्च न्यायालय मुंबईचे औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.7003/2011दिनांक 10/07/2012 रोजी दिलेल्या निर्णयानुसार श्री.शिरीष रामटेके, कनिष्ठ अभियंता (उपअभियंता या पदावरून कनिष्ठ अभियंता या पदावर पदावनत करण्यांत आले आहे.) मनपा, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/आस्था-1/2011/ 1272, दिनांक 06 सप्टेबंर 2011 अन्वये

**त्यांना उपअभियंता या पदावरून कनिष्ठ अभियंता या पदावर पदावनत केल्याच्या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**मा.सभापती** :श्री.शिरीष रामटेके यांनी आपले म्हणने मांडवे.

**श्री.शिरीष रामटेके** :विकास योजना आरक्षण क्रंमाक 87, 88 मालजीपुरा पुष्पनगरी, न भु क्रं.20722 ही जागा ताब्यात घेण्याबाबतच्या कार्यवाहीत अनियमितता केल्याबाबत माझ्या विरूध्द आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश जा.क्र/मनपा/आस्था-1/1272/2011 दिनांक 6-9-2011 रोजी लादलेली शिक्षा उप अभियंता पदावरून कनिष्ठ अभियंता या पदावर पदवनत केल्याबाबत मा. स्थायी समिती समोर अपिल करीत आहे.

सदरील प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून चौकशी अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (जल:निस्सारण) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी चौकशी अहवाल दिनांक 18-9-2007 रोजी सादर केला आहे. यामधील निरीक्षणे /अनुमान /शिफारस यामध्ये मी दोषी असल्याबाबत कुठेही उल्लेख केलेला नाही.

त्यानंतर सदरील प्रकरणी संपूर्ण चौकशी करण्यात आली असून चौकशी अधिकारी तथा मुख्य लेखा परीक्षक यांनी दि.16-03-2011 रोजी अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये माझ्या विरूध्द एकूण 04 दोषारोप लावण्यात आले होते. त्याचा निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

दोषारोप क्रं 1 : नभुक्र. 20722 च्या संपादित केलेल्या जागेचा श्री.गुणवाणी यांच्याकडून ताबा घेत असताना प्रत्यक्षात त्या जागेत श्री. रंगनाथ आसाराम पाटील हे राहत असतांनाही चुकीचा पंचनामा करणे. अंशतः सिध्द होते असा निष्कर्ष देण्यात आला.

दोषारोप क्रं 2 : संपादित केलेल्या जागेची रजीष्ट्री करण्यापूर्वी व ताबा घेत असताना जायमोक्यावर जावून जागा अतिक्रमण रहीत आहे, याची खात्री न करणे. सिध्द होत नाही असा निष्कर्ष देण्यात आला.

दोषारोप क्रं 3 : संपादित केलेल्या जागेची चतु:सिमा पंचनाम्यात नमूद न करणे. सिध्द होत नाही असा निष्कर्ष देण्यात आला.

दोषारोप क्रं 4 : जागेचा ताबा घेतल्यानंतही श्री. रंगनाथ आसाराम पाटील हे त्या जागेत राहत आहे, ही बाब कार्यालयाचे निदर्शनास न आणुन देणे. सिध्द होत नाही असा निष्कर्ष देण्यात आला.

वरील दोषारोप क्रं 2, 3 व 4 मध्ये दोषारोप सिध्द होत नाही, असे निष्कर्ष देण्यात आले आहे व पहिल्या दोषारोपात चौकशी अधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी यांचा चौकशी अहवालातील निष्कर्ष पुढील प्रमाणे आहे.

श्री.एस.डी.रामटेके व्यक्तीशः दोषी नाहीत. तथपि, त्यांच्या अधिपत्याखाली त्यांच्या विभागात आरेखक श्री.शहापुरवाड यांनी प्रत्यक्ष ताबा पावती तयार केली आहे. म्हणून या संदर्भात ते दोषी आहेत व तसेच मालमत्ता अधिकारी म्हणून श्री. एस. डी .रामटेके यांच्यावरही थोडीशी जबाबदारी येते. सदरील दोषारोपात पूर्ण दोषी ठरत नाही. सदरील दोषारोप अंशतः सिध्द होतो.

चौकशी अधिकारी यांनी सुध्दा आपल्या कथनात मी प्रत्यक्ष दोषी नाही. असे कथन केलेले आहे. तसेच सादर करता अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्लम/बी.ओ.टी.) यांनी दि. 25-1-2011 रोजी सादर

केलेल्या अहवालातील अभिप्रायामध्ये सुध्दा माझ्याविरूध्द कुठल्याही प्रकारचे दोषारोप ठेवण्यात आलेले नाहीत.

मी माझ्या निवेदनात सविस्तर खुलासा दिलेला आहे. या प्रकरणात मोबदला अदायगीबाबत संपूर्ण कार्यवाही नगर रचना विभागातर्फे करण्यात आलेली आहे. त्यांनतर पंचनामा करून ताबा पावती करून देण्याचे काम हे दुय्यम आवेक्षक/ आरेखक हे करतात. त्यामुळे मालमत्ता विभागातील आरेखक श्री. शहापुरवाड यांनी ताबा पावती तयार केलेली आहे. सदर ताबा पावतीवर माझी स्वाक्षरी नाही. त्यामुळे माझ्यावर ठेवलेले दोषारोप सिध्द होत नाहीत.

तरी मा. आयुक्त यांनी दिनांक 6-09-2011 रोजी लादलेल्या शिक्षेचा कार्यालयीन आदेश जा.क्र/मनपा/आस्था-1/1272/2011 रद्द करण्यात यावे व मुळ पदावर व आस्थापनेवर प्रस्थापित करण्याचे आदेश देण्यात यावे, ही नम्र विनंती.

मा.सभापती :चार आरोपांपैकी एक आरोप अशतः सिध्द झालेला आहे. पंचनाम्याच्या कॉपीवर जागा ताब्या घेतल्याबाबत श्री.रामटेके यांची पंचनाम्यावर स्वाक्षरी आहे का?

आस्थापना अधिकारी-1 :सर्व कागदपत्रे चौकशी अधिकारी यांनी तपासलेले आहेत. चार दोषारोपापैकी एक आरोप अशंतः सिध्द होतो म्हणुन अहवाल दिलेला आहे. पंचनामा मी स्वतः पाहिलेला आहे. चौकशीमध्ये त्यांनी दिलेले आहे.

मा.सभापती :पंचनामा करीत असतांना पंचनाम्यावर श्री.रामटेके यांची सही होती का?

आस्थापना अधिकारी-1 :चौकशी अधिकारी यांनी पाहिलेले आहे मी पाहिलेले नाही.

मा.सभापती :चौकशी अधिकारी कोण होते?

आस्थापना अधिकारी-1 :तत्कालिन मुख्य लेखापरिक्षक चौकशी अधिकारी होते.

मा.सभापती :कार्यकारी अभियंता (बिओटी) श्री.सिकंदर यांचे इथे नांव कसे आले.

आस्थापना अधिकारी-1 :अहवाल सादर केला होता.

मा.सभापती :काय अहवाल सादर केला थोडक्यात सांगण्यात यावा. दिनांक 25.01.2011 रोजी अहवाल सादर केलेला आहे त्याबाबतीत सांगण्यात यावे.

कार्यकारी अभियंता(बिओटी):सदरील आरोप त्यांना मान्य नाही. सदरील जागेचा ताबा त्यांचे विभागातील अनुरेखक श्री.शहापुरवाड यांनी घेतलेला आहे. सदरील जागा ताबा आणि खरेदी खत करून घेण्यापुर्वी जागेवर परिस्थिती त्यांनी स्वतः श्री.एस.एस.गायकवाड दुय्यम आवेक्षक, नगर रचना विभाग व मालमत्ता विभागातील श्री.शहापुरवाड यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पडताळणी केली असता त्या ठिकाणी मोठमोठी बाभळीचे झाडे, गाजर गवत व एरंडीचे झ ााले आणि इतर झाडेझुडपे असुन त्या ठिकाणी 15 X 8 ची पडक्या स्थितीतील खोली व एक शेड आढळुन आली. त्या ठिकाणी झाडे झुडपे असल्याने त्या ठिकाणी कुणीही मनुष्य राहत नव्हते. ही त्या वेळची वस्तुस्थिती आहे. सदर 50X8 ची खोलीमध्ये कुणी राहत नव्हते हे स्पष्ट दिसत होते व खरेदीखत करून घेतांना तद्‌भुत वस्तुस्थिती व संपुर्ण नोंद करून नोंदणीकृत अभिलेख करून घेण्यात आले आहे. तसेच पडक्या घरात कुणीच राहत नसल्याचे आढळुन आले. तेथील झाडेझुडपे परिस्थिती पहाता त्या ठिकाणी श्री.रंगनाथ आसाराम पाटील हे तिथे राहत नव्हते.

असे सिध्द होते त्यामुळे श्री. रंगनाथ आसाराम पाटील हे त्या जागेत राहत होते हा प्रश्न उद्‌भवत नाही. पंचनामा घेण्यास व पंचनामा चुकीचा केला. असे म्हणता येणार नाही. परंतु आज त्या ठिकाणी पहाणी केली असता 15X8चे नविन अतिरिक्त बांधकाम  झालेले दिसुन आले याबाबतीत जे एम एस वरील नकाशात दर्शविलेले  बांधकाम व सध्यास्थितीत बांधकाम हे खरेदी खत व ताबा घेतल्यानंतर दिसुन येते. याबाबतीत खातरजमा करून घ्यावी यावरून श्री.रंगनाथ आसाराम पाटील हे ताबा घेतल्यानंतर ते राहयला आले असे त्यांचे मत आहे. तथापी यांचे विभागातील आरेखक श्री.शहरापुरवाड यांनी त्यांचे अभिकथनात मान्य केले आहे की, सदर जागेची मध्यस्थळी जाण्याची आवश्यकता नव्हती. श्री.एस.डी.पानझडे यांचे दिनांक 18.1.2007 च्या चौकशी अहवालात सदरील जमीनीवर रंगनाथ आसाराम पाटील हे त्यांचे कुटूंबासह राहत असल्याचे नमूद केले आहे. या दोषारोपा संदर्भात श्री.रामटेके व्यक्तीशः दोषी नाहीत. तथापी त्यांच्या अधिपत्याखाली त्यांचे विभागात आरेखक श्री.शहापुरवाड यांनी प्रत्यक्ष ताबा पावती तयार केली आहे. म्हणुन या संदर्भात ते दोषी आहेत. तसेच मालमत्ता अधिकारी म्हणुन श्री.एस.डी.रामटेके यांचेवरही थोडीशी जबाबदारी येते. सदरील दोषारोपात ते पुर्णतः दोषी ठरत नाहीत. सदरील दोषारोप अंशतः सिध्द होतो.

**मा.सभापती** :आपल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे.

**कार्यकारी अभियंता (बिओटी)**: एका लिपीकाने सबमिशन केले व वरिष्ठ अधिकारी बीओटी, सहा.संचालक न.र.यांनी ते फायनल केले. इतर/बाकीचे तीन अधिकारी कुठे गेलेत. त्याच्यावर अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता हे आहे. लिपीकाने सबमिशन केले ते फायनल केले.

**मा.सभापती** : हे सर्व लेखी देण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता (बिओटी)**:काम सुव्यवस्थित होईल.

**मा.सभापती** : जी सूचना कार्य.अभियंता यांनी केली त्यांची नोंद घेण्यात येईल व त्या सूचनेनुसारच निर्णय देण्यात येईल.

**निर्णय :**

आजच्या सभेपुढे असलेल्या अपिला संदर्भात अपिलकर्ता श्री.शिरीष रामटेके व प्रशासनाचे म्हणणे ऐकुन घेतले असून या अपीलावरील निर्णय राखुन ठेवण्यात येत आहे. सर्व अपिलांची सुनावणी झाल्यानंतर निर्णय घोषीत करण्यात येईल.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद